महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: पीडब्ल्यूडी-४२१८/सीआर-२४/२०१८/तेरा दिनांक :- ७ ऑक्टोबर, २०२१

## घोषणा

विषय :- दिव्यांग व्यक्ती लिहिण्याकरीता सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक व इतर सोयी-सवलती उपलब्ध करुन देणेबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्यावेळी दिव्यांग उमेदवार लिहिण्यासाठी सक्षम नसल्यास त्यांच्या मागणीप्रमाणे परीक्षेच्यावेळी लेखनिक तसेच अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने आयोगाच्या संकेतस्थळावर ‘दिव्यांग उमेदवारांकरीता मार्गदर्शक सूचना’ प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या जाहिरातीस अनुसरुन अर्ज सादर केल्यानंतर संबंधित दिव्यांग उमेदवारांनी लेखकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असल्यास आयोगाकडे संबंधित सर्व कागदपत्रांसह विनंती अर्ज (प्रपत्र-१ अथवा प्रपत्र-२) सादर करुन पूर्व परवानगी घेणे अनिवार्य आहे.

३. आयोगामार्फत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२१ रोजी आयोजित ‘सहायक आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, महापालिका वरिष्ठ सेवा, गट-अ परीक्षा - २०२१’ करीता आयोगास अर्ज सादर केलेल्या व लेखनिकाची मदत घेण्याची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवारांनी विहित नमुन्यातील विनंती अर्ज संबंधित सर्व कागदपत्रांसह pre-examination@mpsc.gov.in या ईमेल आयडी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१ पर्यंत पाठविणे आवश्यक आहे.

४. केवळ संबंधित जाहिरातीस अनुसरुन ऑनलाईन अर्ज सादर करताना लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीकरीता दावा केला म्हणून उमेदवारांना लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीची सवलत देय असणार नाही. ऑनलाईन अर्जाद्वारे दावा करुन उमेदवारांना विहित पध्दतीने आयोगाकडून स्वतंत्र पूर्व परवानगी घेतली असल्यास लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीची सवलत देय राहील.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

ठिकाण : मुंबई